# वैद्यनाथ मंदिरासमोरच मंदिर कर्मचारी आणि ऑटोचालकाचा राडा!




परळी (सरकार): बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र वैद्यनाथ मंदिरात श्रावण महिन्यानिमित्त भाविकांची मोठी गर्दी होत असतानाच, मंदिरासमोरील मुख्य रस्त्यावरच मंदिर कर्मचारी आणि ऑटोचालकामध्ये हाणामारी झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे काही काळ परिसरात एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, वैद्यनाथ मंदिरातील एका कर्मचाऱ्याचा आणि ऑटोचालकाचा वाद विकोपाला गेल्यानंतर दोघांमध्ये तुफान हाणामारी झाली. मंदिरासमोरच हा प्रकार घडल्याने भाविकांची मोठी गर्दी झाली आणि काही काळ वाहतूक ठप्प झाली. या घटनेत मंदिरासमोरील बॅनरही फाटल्याचे समोर आले आहे.श्रावण महिन्यामुळे परळी वैजनाथ येथे राज्याच्या विविध भागांतून भाविक दर्शनासाठी दाखल होत आहेत. अशा गर्दीच्या काळात मंदिरासमोरील मुख्य रस्त्यावरच हाणामारी झाल्याने भाविकांमध्येही काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला असून वाहतूकही सुरळीत करण्यात आली.

मंदिरासमोरील वाढती गर्दी, वाहतूक कोंडी आणि अशा प्रकारच्या वादाच्या घटना पाहता मेरुगिरी पर्वत मार्गे चारचाकी वाहने सोडण्याची नागरिकांची अनेक दिवसांपासूनची मागणी पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. भाविकांची सुरक्षितता आणि मंदिर परिसरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन याबाबत काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या हाणामारीमागचे नेमके कारण काय? संबंधितांवर पोलिसांकडून कोणती कारवाई करण्यात आली? याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.






beedsarkar

संपादक-आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com किंमत: १ रू. पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र वर्ष १३ वे अंक २७२ बुधवार ९ सप्टेंबर २०२६ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दि.१० सप्टेंबर २०२६ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA Year 13 Issu 272 Wednesday 9 September 2026 RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


## पेठ बीड पोलीसांची सापळा रचून मोठी कारवाई

# १० लाख ६३ हजार ६०० रुपयांचा गुटखा पकडला

बीड (सरकार) : आज पेठ बीड पोलिसांनी बार्शीनाका येथे सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांच्या स्कॉर्पिओ वाहनातून विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूचा साठा आढळून आला. गुटखा आणि वाहन असा एकूण १० लाख ६३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

बुधवारी (९ सप्टेंबर) सकाळी सव्वादहाच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. पेठ बीड पोलिसांना मांजरसुंबा परिसरातून स्कॉर्पिओ वाहनातून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करून बीडकडे येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी बार्शीनाका परिसरात नाकाबंदी करून सापळा रचला.

मांजरसुंबाकडून बीडकडे येणारे महिंद्रा स्कॉर्पिओ (एमएच-२३-एएस-५५२२) वाहन पोलिसांनी अडवून झडती घेतली. वाहनामध्ये प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तंबाखूचा मोठा साठा आढळून आला. याप्रकरणी दत्ता भारतराव घोडके (३६, रा. लोळदगाव, कुर्ला) आणि ओमकार गहिनीनाथ घोडके (३०, रा. घोडका राजुरी) या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये प्रतिबंधित गुटख्यासह स्कॉर्पिओ वाहनाचा समावेश असून, एकूण किंमत १० लाख ६३ हजार ६०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, या कारवाईनंतर




अन्न व औषध प्रशासन विभागाच्या माध्यमातून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

बीड जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तंबाखूची अवैध वाहतूक आणि विक्री सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून सातत्याने कारवाया सुरू आहेत. पेठ बीड पोलिसांच्या या कारवाईमुळे गुटखा वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. मात्र गुटखा माफीयांची पाळेमुळे शोधून मुळाशी घाव घालण्याची पोलिसांची आज गरज आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निलेश केळे ,डिबी पथकचे ीळि शहा,नितीन राठोड,विष्णू गुजर,अलतफ शेख,औदुंबर गिरी,पांडुरंग पर्जने, कल्याण जाधव,शरद भारती, तुकाराम चांदणे यांनी केली

## मराठवाड्यातील कोरड्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक घ्या

### आ.धनंजय मुंडेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई (सरकार): बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने ओढ दिल्यामुळे निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळसदृश परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे येत्या १७ सप्टेंबर रोजी किंवा तत्सम कालावधीत लवकरात लवकर मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करून दुष्काळजन्य परिस्थितीवर उपाययोजना व शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.



यंदाच्या खरीप हंगामात पावसाने तीव्र ताण दिल्याने पिकांचे अतोनात नुकसान झाले असून खरीप हंगामात मराठवाड्यात सरासरीच्या ५० टक्केही पाऊस झालेला नाही. यामुळे पेरलेली सर्व खरीप पिके करपून गेली असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

त्याचबरोबर विहिरी आणि तलावांतील जलस्रोत कोरडे पडल्याने येत्या काळात पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर रूप धारण करणार आहे, यावरही तातडीने उपाययोजना करणे व वेळीच योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे शासकीय ध्वजारोहण सोहळा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार पडणार आहे. याच औचित्यावर किंवा तत्सम वेळेत लवकरात लवकर छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेऊन मराठवाड्यासाठी विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करण्यात यावे, अशीही विनंती मुंडे यांनी आपल्या पत्रात केली आहे. मराठवाड्यातील संकटाच्या काळात नेहमीच राज्य सरकारने पुढाकार घेऊन मदत केलेली आहे. त्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे आधीही अनेकदा मंत्रिमंडळाची विशेष बैठक बोलावण्यात आलेली आहे. त्यादृष्टीने मराठवाड्यात ही विशेष मंत्रिमंडळ बैठक आयोजित करून कोरडा दुष्काळ जाहीर करून सवलती देणे, खरीप पिकांच्या नुकसानीची भरपाई, रब्बी हंगामाचे नियोजन, तसेच पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्याबाबत ठोस उपाययोजना करण्यात याव्यात, असेही श्री मुंडे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. मराठवाड्याप्रमाणेच विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातही पावसाअभावी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मराठवाड्यासह या भागांसाठीही स्वतंत्र मंत्रिमंडळ बैठका घेऊन तातडीने निर्णय घेण्यात यावेत, अशी विनंतीही धनंजय मुंडे यांनी पत्रात केली आहे.

## पाटबंधारे विभागाच्या कार्यालयात वृक्षतोड

### कार्यकारी अभियंता पवार यांच्यावर कारवाईची मागणी ;जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

बीड (सरकार): पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यावर भर दिला जात असताना बीड जिल्ह्यात वनक्षेत्राचे प्रमाण अत्यल्प असल्याचा दावा केला जात आहे. त्यातच अवैध लाकूडतोड व वृक्षतोडीच्या घटना सुरू असताना शासकीय कार्यालयांच्या आवारातील वृक्षांचीही तोड होत असल्यास ही गंभीर बाब असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.




बीड शहरातील जिल्हा रुग्णालयासमोर असलेल्या पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाच्या आवारातील लिंबाच्या झाडांची मोठ्या प्रमाणावर तोड करण्यात आल्याचे डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. विशेष म्हणजे कार्यालयाच्या आवारातील झाडे रस्त्यालगतच्या कामात अडथळा निर्माण करत नसतानाही त्यांची तोड का करण्यात आली, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

या वृक्षतोडीबाबत संबंधित विभागाकडून आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का, वृक्षतोडीचे कारण काय होते आणि तोडलेल्या झाडांबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली, याची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे आणि रामनाथ खोड यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे.



तसेच या प्रकरणात नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता एस. एन. पवार यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी अशी मागणीही तक्रारीत करण्यात आली आहे.

'पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या शासनाच्या यंत्रणेतच जर शासकीय कार्यालयांच्या आवारातील वृक्षांची विनाकारण तोड होत असेल, तर ही बाब गंभीर असून प्रशासनाने याची दखल घ्यावी,' अशी भूमिका डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

## मनोज जरांगेंच्या उपोषणाचा १२ वा दिवस अंतरवालीत दोन दिवस दारुबंदी-जिल्हाधिकारी

जालना (सरकार): मराठा आरक्षण आणि जात पडताळणी प्रमाणपत्रासह विविध मागण्यासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषण सुरू आहे. जरांगे पाटलांच्या उपोषणचा आज १२ दिवस असून सरकारकडूनही त्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, अद्याप तोडगा न निघाल्याने जरांगे यांनी अंतरवालीत १२ सप्टेंबर रोजी मराठा बांधवांची बैठक बोलावली आहे. तर, सरकार मागण्या मान्य करत नसल्याने मराठा समाजही आक्रमक झाल्याचं दिसून येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अमिशा मित्तल यांनी दारुबंदीबाबत महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत.




मनोज जरांगे यांच्या अंतरवालीतील मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार किंवा दंगल सदृश्य परिस्थिती होऊ नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून दोन दिवस म्हणजेच आज आणि उद्या अंतरवाली सराटी येत असलेल्या गोंदी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये मध्ये विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. मौजे अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासंबंधी आंदोलन सुरू असून जमाव वाढण्याची शक्यता लक्षात घेता संबंधित गावांमध्ये असलेल्या घाऊक (देशी/विदेशी मद्य) मद्यविक्री अनुज्ञप्त्या सुरु राहिल्याने काही अनुचीत प्रकार/दंगल घडून सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, येथील सार्वजनिक शांतता अबाधित राखणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ मधील कलम १४२ (१) अन्वये जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दारुबंदीचे आदेश जारी केले आहेत. गोंदी पोलीस ठाणे हद्दीतील सर्व घाऊक (देशी/विदेशी मद्य) मद्यविक्री दुकानदारासाठी ९ ते १० सप्टेंबर रोजी संपूर्ण दिवस मद्यविक्री बंद ठेवण्याचे (कोरडा दिवस) आदेश देण्यात आले आहेत.

## परळीत अल्पवयीन मुलीवर अत्याचार

परळी वैजनाथ (सरकार) खेळताना एका आडबाजूला नेऊन १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना परळी तालुक्यात घडली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून, पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून परळी पोलिसांनी गावातीलच एका २७ वर्षीय तरुणावर 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला तत्काळ अटक केली आहे. आकाश भरत नागरगोजे (वय २७, रा. जिरेवाडी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास पीडित मुलगी गावातील मारुती मंदिर परिसरात खेळण्यासाठी गेली होती. मात्र, बराच वेळ झाला तरी ती घरी परतली नाही. चिंताग्रस्त झालेल्या कुटुंबीयांनी मंदिर परिसर, गाव आणि नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला, परंतु ती कुठेही मिळून आली नाही.

काही वेळानंतर पीडित मुलगी अत्यंत घाबरलेल्या अवस्थेत रडत घरी पोहोचली. आरोपी आकाश याने खेळत असताना तिला फूस लावून आडबाजूला नेले आणि तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केल्याचे तिने रडत-रडत कुटुंबीयांना सांगितले. घडलेला गंभीर प्रकार समजताच मुलीच्या आईने थेट परळी पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी संशयित आरोपी आकाश नागरगोजे याच्याविरुद्ध 'पोक्सो' कायद्या अन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपीला तातडीने ताब्यात घेत बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## गढी-माजलगाव रोड खांडवी टोल वर ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्राविरोधात रास्ता रोको

गेवराई (सरकार)मौजे खांडवी, ता. गेवराई, जि. बीड येथील गट क्रमांक ३९४ मधील कसत असलेल्या गायरान जमिनीवर शासनाच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत प्रस्तावित असलेले ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्र तात्काळ रद्द करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी बुधवारी दि. ९ सप्टेंबर २०२६ राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ वरील गढीह्नमाजलगाव हायवे, खांडवी टोल नाका येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) तालुका गेवराईच्या वतीने समाजबांधवांच्या प्रश्नांसाठी हे आंदोलन करण्यात आले. आर पी आय चे तालुका अध्यक्ष किशोर कांडेकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलनकर्त्यांनी रस्त्यावर उतरून गायरान धारकांच्या हक्काचा प्रश्न प्रशासनासमोर ठामपणे मांडला.



गायरान जमिनीवर अनेक वर्षांपासून कसत असलेल्या धारकांच्या हक्कांवर गदा येऊ नये तसेच त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होऊ नये, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली. संबंधित विद्युत उपकेंद्रासाठी गायरान जमीन वापरण्याचा निर्णय तात्काळ रद्द करून गायरान धारकांना न्याय द्यावा, या मागणीसाठी यावेळी , धम्मपाल सौदरमल,बाळु माटे ,कचरू उर्फ राजूभोले , नारायण रोहिदास भोले , जनाबाई निवृत्ती भोले, प्रकाश तात्याराम भोले , देविदास दादाराव भोले, विलास रामकिसन भोले, कमल अण्णासाहेब भोले, विष्णू गुणाजी भोले, शाहू सखाराम भोले, शेषेराव नाथा भोले, शालन सर्जेराव कोकाट, संजय भोले, गणपत भोले, गोविंद भोले,करण्यात आली. गायरान धारकांच्या हक्कासाठी संघर्ष सुरूच राहणार असा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला. आंदोलनामुळे एक तास महामार्गावरील वाहतुक ठप्प झाली होती. गायरान हक्क हक्काचा लढा, संघर्ष आणि RPI ची एकजूट या भूमिकेतून आंदोलन करण्यात आले.

# चौफेर
नवा विचार.. नवा हुंकार...




## केरेट हाउस

**पोलंडमधील वॉर्सा शहरात दोन इमारतींच्या मधल्या अरुंद जागेत वसलेले 'केरेट हाउस' हे जगातील सर्वात अरुंद घर म्हणून ओळखले जाते. या वास्तूची रुंदी सर्वात अरुंद ठिकाणी केवळ ७२ सेंटीमीटर आहे, तर सर्वात रुंद ठिकाणी ती १२२ सेंटीमीटर इतकी आहे.**

'सेंट्राला' या संस्थेचे पोलिश वास्तुविशारद याकुब श्झेस्नी यांनी केरेटे हाउस या अनोख्या वास्तूची रचना एक कलाकृती आणि राहण्यायोग्य जागा अशा दोन्ही उद्देशांनी केली होती. युद्धोत्तर काळातील गृहनिर्माण संस्था आणि युद्धापूर्वीची ज्यूंची जुनी इमारत यांच्यातील पूर्वी पडून असलेल्या सुमारे १५० चौरस फूट जागेत हे घर उभारले गेले आहे.

या घराची रचना उपलब्ध असलेल्या प्रत्येक सेंटीमीटर जागेचा पुरेपूर वापर करण्याच्या दृष्टीने करण्यात आली आहे. याच्या संक्षिप्त अंतर्गत भागात स्वयंपाकघर, जेवणाची व बसण्याची जागा, स्नानगृह, कामाची जागा आणि झोपण्याची जागा यांचा समावेश असून, या सर्व गोष्टी वेगवेगळ्या स्तरांवर विभागलेल्या आहेत.

या घराचे प्रवेशद्वार मुख्य रस्त्यावरून थेट दिसत नाही. अभ्यागतांना एका गल्लीतून आत जावे लागते, जिथे स्टीलच्या पायऱ्या इमारतीकडे घेऊन जातात. तसेच, पदपथावरून मुख्य प्रवेशद्वार दिसू नये म्हणून तिथे सुमारे साडेसहा फूट उंच भिंत उभारण्यात आली आहे. घराच्या आत तीन स्तर आहेत. तळमजल्यावर प्रवेशद्वार आहे, तर पुढच्या मजल्यावर स्नानगृह, स्वयंपाकघर, बसण्याची जागा आणि कामाची जागा आहे. एका शिडीद्वारे वरच्या मजल्यावर जाता येते, जिथे अंथरुण ठेवलेले आहे.

श्झेस्नी यांना ही कल्पना तेव्हा सुचली जेव्हा ते रस्त्यावरून चालत असताना त्यांना दोन इमारतींमधील ती असामान्य अरुंद फट दिसली. त्या जागेचा वापर करून एक अशी उपयुक्त वास्तू तयार करण्याची कल्पना त्यांनी मांडली, जी त्या दोन इमारतींना प्रभावीपणे जोडेल.

हा प्रकल्प इस्रायली लेखक एतगार केरेट यांच्यासाठी उभारण्यात आला होता, जे याचा वापर कामाची जागा आणि कधीकधी राहण्याचे ठिकाण म्हणून करतात. वॉर्साच्या बांधकाम नियमांमुळे अनेक आव्हाने उभी राहिली असतानाही याच्या बांधकामाला सुरुवात झाली. 'हाउझ' मासिकाच्या वृत्तानुसार, या वास्तूचे असामान्य आकारमान, स्थान आणि उद्देश यामुळे शहराच्या प्रशासनाने याला 'कलाकृती' म्हणून वर्गीकृत केले.

सुमारे तीन वर्षांच्या कामानंतर ऑक्टोबर २०१२ मध्ये हा प्रकल्प पूर्ण झाला. आजही 'केरेट हाउस' हे वॉर्सातील सर्वात अनोख्या वास्तुशिल्पीय खुणांपैकी एक मानले जाते. अत्यंत अरुंद आणि दुर्लक्षित शहरी जागेचे रूपांतर एका उपयुक्त वास्तूत कसे केले जाऊ शकते, याचे हे घर उत्तम उदाहरण आहे.



# जखमी जनावरांना सांभाळणारा अवलिया

**ज्या काळात लोकांना आपल्या शेजारी राहणाऱ्या माणसांसाठीही वेळ नसतो, त्या काळात बिहारमधील मनोज अरोरा आपला बहुतेक वेळ मोगा या आपल्या गावाच्या रस्त्यांवरील जखमी जनावरांची काळजी घेण्यात घालवतात. आजच्या काळात हे काम खूपच कठीण वाटू शकते, पण अरोरा आपण स्वेच्छेने करत असलेल्या या कामाची फारशी वाच्यता न करता ही जबाबदारी आनंदाने स्वीकारतात. गेल्या २६ वर्षांपासून हाच त्यांचा दिनक्रम राहिला आहे!**

मनोज अरोरा हे केवळ रस्त्यांवरील आजारी आणि जखमी जनावरांनाच वाचवत नाहीत, तर त्यांच्या उपचारांची व्यवस्थाही करतात आणि जी जनावरे चालू शकत नाहीत त्यांची काळजीही घेतात.

एका जनावराला वाचवण्यापासून सुरुवात करून, जेव्हा कधी एखादी गाय जखमी अवस्थेत पडलेली आढळायची, तेव्हा अरोरा हेच एकमेव संपर्क केंद्र बनले. यासाठी त्यांना अनेक वर्षे लागली असली तरी, त्यांच्या प्रयत्नांना आता एका संघटित बचाव सेवेचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यांच्याकडे एक हायड्रॉलिक रुग्णवाहिका आणि जखमी गायी व बैलांवर उपचार करण्यासाठी सुसज्ज असा निवारा आहे. अरोरा यांच्या अंदाजानुसार, त्यांनी आणि त्यांच्या टीमने आतापर्यंत २० हजार ते २५ हजार जनावरांना मदत केली आहे.

जेव्हा कधी भटक्या जनावरांना रस्ते अपघातात धडक बसते, ज्यात अनेकदा वाहनचालक आणि जनावरे दोघेही ठार किंवा जखमी होतात, तेव्हा अरोरा यांची टीम तत्परतेने कामाला लागते आणि रुग्णवाहिकेच्या मदतीने त्या जनावराला उचलते. जर ते जनावर जिवंत असेल, तर त्याला निवाऱ्यात नेले जाते आणि बरे होईपर्यंत त्याची काळजी घेतली जाते. अपघातामुळे कायमचे अपंग झालेल्या जनावरांसाठी निवाऱ्यात वेगळी व्यवस्था केली जाते, जेणेकरून त्यांना इतर जनावरांकडून आणखी इजा होऊ नये.

स्थानिक रहिवाशांच्या मदतीने, अरोरा यांनी एक हायड्रॉलिक कॅटल ॲम्ब्युलन्सची व्यवस्था केली. यामुळे वाहतुकीची समस्या सुटली असली तरी, वाचवलेल्या जनावरांवर उपचार करण्यासाठी आणि त्यांना ठेवण्यासाठी अजूनही एका जागेची गरज होती. त्यांनी अनेक गोशाळांशी संपर्क साधला आणि त्यांना आजारी व जखमी जनावरांसाठी जागा देण्याची विनंती केली. जसजसे त्यांचे काम विस्तारले, तसतसे एका समर्थकाने जमीन दान केली. या जागेचा नंतर जनावरांच्या रुग्णालयात विकास करण्यात आला. ही गोशाळा प्रामुख्याने आजारी, जखमी किंवा बेवारस जनावरांना स्वीकारते. केवळ दूध देतात म्हणून निरोगी गायींना येथे घेतले जात नाही.

हे निवारागृह चालवण्यासाठी दरमहा अडीच लाख ते तीन लाख रुपये खर्च येतो. पाच कामगारांना कामावर ठेवले आहे, तर एक पशुवैद्य कायमस्वरूपी उपलब्ध असतो. रुग्णवाहिका सेवा, वीज, औषधे आणि चारा यावर मोठा खर्च होतो.

# कबर खोदण्याची अनोखी स्पर्धा





**मृत्यूइतकेच हे प्रकरण गंभीर होते, यात काहीही थट्टा नव्हती.कारण हंगेरीमधील एका स्मशानभूमीत 'कबर खणण्याची स्पर्धा' ऐकायला एखाद्या विनोदी कार्यक्रमाच्या सुरुवातीसारखी वाटू शकते. पण प्रत्यक्षात मात्र ती तशी नव्हती; ३८ स्पर्धकांनी कुदळी आणि फावडी हाती घेऊन ही स्पर्धा गाजवली.**

कबर खणण्याच्या व्यवसायाचे स्वरूप आणि त्यातील कौशल्ये लोकांसमोर आणण्यासाठी, तसेच मृत्यूशी संबंधित गैरसमज किंवा सामाजिक बंधने दूर करण्यासाठी 'हंगेरियन असोसिएशन ऑफ सिमेट्री मेंटेनर्स अँड ऑपरेटर्स' ही स्पर्धा आयोजित करते. उत्तर हंगेरीमधील 'न्येरगेसुजफालू' येथील सार्वजनिक स्मशानभूमीतील उन्हाळ्यामुळे कडक झालेली जमीन, दोन व्यक्तींचा ग्रुप असलेल्या १९ टीमसाठी एक मोठे आव्हान ठरली. सर्वात वेगाने आणि सुबकपणे कबर खणण्याच्या स्पर्धेत बाजी मारण्यासाठी त्यांना प्रचंड मेहनत करावी लागली; घामाघूम होऊन आणि धाप लागूनही ते प्रयत्न करत राहिले.

येथे वेग महत्त्वाचा आहे, सौंदर्य नाही, असे विजेते स्पर्धक रॉबर्ट नागी यांनी आपला सहकारी लास्झ्लो किस याच्यासोबत बोलताना सांगितले. जेव्हा अंत्यसंस्कारासाठी कबर खणायची असते, तेव्हा तिचे अचूक आकारमान राखणे आणि ती सुबकपणे तयार करणे या गोष्टींची विशेष काळजी घ्यावी लागते.

त्यांनी १ तास २१ मिनिटांत कबर खणून स्पर्धा जिंकली. स्पर्धेच्या नियमांनुसार, कबर १.६ मीटर खोल, २ मीटर लांब आणि ०.८ मीटर रुंद असणे आवश्यक होती. त्यांना २ लाख हंगेरियन फोरिंट्स (सुमारे ६४० डॉलर्स) इतके रोख बक्षीस विभागून देण्यात आले.

# सिनेमास्कोप...



## आयशा खानचा मराठमोळा थाट

अभिनेत्री आणि मॉडेल आयशा खान तिच्या स्टायलिश लूकसाठी सोशल मीडियावर नेहमीच चर्चेत असते. तिच्या फॅशनची चाहत्यांमध्ये कायम चर्चा पाहायला मिळते. मात्र यावेळी आयशाने आपल्या ग्लॅमरस अंदाजापेक्षा पारंपरिक मराठमोळ्या लूकने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

नुकतीच आयशा एका भव्य दहीहंडी उत्सवाला प्रमुख पाहुणी म्हणून उपस्थित राहिली होती. या खास कार्यक्रमासाठी तिने खास मराठी पारंपरिक वेशभूषा निवडली होती. तिचा हा सोज्वळ आणि सुंदर अंदाज पाहून उपस्थितांसोबतच सोशल मीडियावरही चाहत्यांनी तिचे कौतुक केले आहे. दहीहंडी कार्यक्रमासाठी आयशाने हिरव्या रंगाची सुंदर साडी नेसली होती. साडीवरील आकर्षक नक्षीकामामुळे तिचा लूक आणखी खुलून दिसत होता. पारंपरिक साडीला आधुनिक स्टाइलचा स्पर्श देत आयशाने हा लूक अतिशय सुंदरपणे कॅरी केला.

हिरव्या साडीचा रंग आणि त्यावर केलेली नाजूक सजावट यामुळे आयशाचा संपूर्ण लूक उठून दिसत होता. कार्यक्रमाच्या ठिकाणी तिच्या या पारंपरिक लूकने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. आयशाने केवळ साडीच नाही, तर दागिन्यांची निवडही अगदी पारंपरिक ठेवली होती. तिने गळ्यात ठुशी घातली होती. नाकात पारंपरिक नथ आणि कपाळावर चंद्रकोर लावून तिने आपला मराठमोळा लूक पूर्ण केला. या पारंपरिक दागिन्यांमुळे आयशाच्या लूकला एक वेगळाच सोज्वळपणा आला होता. साधेपणा आणि पारंपरिक सौंदर्य यांचा सुंदर मेळ तिच्या या लूकमध्ये पाहायला मिळाला.

## नोरा फतेहीविरोधात मानहानीचा दावा

बॉलिवूड अभिनेत्री आणि डान्सर नोरा फतेही सध्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. चार्टर्ड विमानाबाबत केलेली टिप्पणी आता तिच्यासाठी कायदेशीर अडचणीचे कारण ठरली आहे. एका खासगी विमान कंपनीने नोरा फतेहीविरोधात गुजरातमधील गांधीनगर कोर्टात ३ कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, नोराने विमानाबाबत केलेल्या काही टिप्पण्यांमुळे त्यांच्या व्यवसायाच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला. या प्रकरणाची सुनावणी गांधीनगरमधील वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश आर. अग्रवाल यांच्या न्यायालयात होणार आहे. २५ सप्टेंबर रोजी या प्रकरणावर सुनावणी होण्याची शक्यता आहे.

या वादाची सुरुवात गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये झाली. नोरा फतेही मुंबईहून जयपूरला जाण्यासाठी एका खासगी चार्टर्ड विमानाने प्रवास करत होती. हे विमान सेसना सायटेशन उग२ असल्याचे सांगितले जात आहे. प्रवासादरम्यान नोराने विमानातील काही व्हिडीओ तयार केले आणि ते सोशल मीडियावर शेअर केले. या व्हिडीओमध्ये नोराने विमानाला लेगो विमान, टॉय प्लेन आणि खूप छोटे विमान अशा शब्दांत संबोधल्याचा आरोप आहे. तिच्या या टिप्पण्यांवरूनच आता वाद निर्माण झाला आहे.

ड्यून्स एव्हिएशन या खासगी विमान कंपनीने नोराच्या या वक्तव्यावर आक्षेप घेतला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, नोराचे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात फॉलोअर्स आहेत. त्यामुळे तिच्या बोलण्याचा मोठ्या संख्येने लोकांवर परिणाम होऊ शकतो.



## तब्बल १४ किलो वजन वाढवलं

चित्रपटातील भूमिका अधिक प्रभावी आणि अस्सल वाटावी यासाठी कलाकारांना अनेकदा त्यांच्या लूकमध्ये तसेच शारीरिक स्वरूपात बदल करावे लागतात. यासाठी त्यांना मोठी मेहनतही घ्यावी लागते. या माध्यमातून पात्र समजून घेण्यासोबतच ते प्रत्यक्षात जगण्याचा प्रयत्न कलाकार करत असतात. अभिनेत्री निमिषा सजयननेही आपल्या भूमिकेसाठी असाच मोठा बदल केला आहे. बबिता सिंग रिपोर्टिंग या चित्रपटातील भूमिकेसाठी तिने तब्बल १४ किलो वजन वाढवलं आहे. नुकताच तिने या अनुभवाबद्दल खुलासा केला.

या क्राईम ड्रामा आणि मिस्ट्री–थ्रिलर चित्रपटात निमिषा पोलीस अधिकारी बबिता सिंग अर्थात बेबीची भूमिका साकारत आहे. या भूमिकेसाठी तिची निवड झाली, त्यावेळी तिचं वजन सुमारे ५८ किलो होतं. त्यानंतर डॉक्टर, शेफ आणि इतर व्यावसायिकांच्या मदतीने तिने वजन वाढवण्याची तयारी सुरू केली. तिचा आहार हळूहळू वाढवण्यात आला. त्यानंतर तिचे वजन तब्बल ७२ किलो झाले. या अनुभवाबद्दल बोलताना निमिषाने सांगितले, माझ्यासाठी हा अनुभव एका दुःस्वप्नासारखा होता. दररोज ८ हजार कॅलरीज घेणे खूप जास्त होते. अक्षरशः पोटात अन्न कोंबावे लागत होते. मात्र, या संपूर्ण प्रक्रियेचा मला आनंदही मिळाला. त्यामुळे मी माझ्या पात्राच्या आणखी जवळ जाऊ शकले. मात्र, चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतर पुन्हा वजन कमी करणे तिच्यासाठी तितकेच आव्हानात्मक ठरले. चित्रीकरण संपल्यानंतर तिने वजन कमी करण्यास सुरुवात केली असून, या प्रवासातील काही पोस्टही तिने सोशल मीडियावर शेअर केल्या आहेत. आपल्या दिसण्यावर होणाऱ्या प्रतिक्रिया आणि मतांबद्दलही निमिषाने भाष्य केलं. लोकांच्या प्रतिक्रिया आता पूर्वीप्रमाणे आपल्यावर परिणाम करत नाहीत आणि त्या गोष्टी आपण फारशा गांभीर्याने घेत नसल्याचे तिने स्पष्ट केले. या चित्रपटाचे दिग्दर्शन अंबिका पंडित यांनी केले आहे. चित्रपटात निमिषा सजयनसोबत अंशुमन पुष्कर, बरुण सोबती, सुनीता राजवार आणि राजेश कुमार यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाचा प्रीमियर २८ ऑगस्ट रोजी ॲमेझॉन प्राइमवर झाला आहे.



## राहुल रॉयने केला खुलासा

१९९० मध्ये प्रदर्शित झालेल्या आशिकी या चित्रपटाने हिंदी सिनेसृष्टीत प्रेमाची नवी व्याख्या मांडली. या चित्रपटातून अभिनेता राहुल रॉय रातोरात स्टार झाला. त्याच्या अभिनयाची आणि लूकची तरुणांमध्ये मोठी क्रेझ निर्माण झाली होती. मात्र, नंतर राहुल रॉयच्या करिअरला अपेक्षित अशी गती मिळाली नाही. मोठ्या चित्रपटांच्या संधी कमी होत गेल्या आणि पुढे अभिनेत्याला आर्थिक अडचणींचाही सामना करावा लागला. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत राहुल रॉय यांनी आपल्या आयुष्यातील कठीण काळाबद्दल खुलासा केला. आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी अभिनेत्याने लग्नसमारंभ आणि विविध कार्यक्रमांमध्ये नृत्य सादर करून पैसे कमावल्याचे सांगितले. एका कार्यक्रमातील सादरीकरणातून आपल्याला दोन ते चार लाख रुपये मिळत असल्याचे अभिनेत्याने स्पष्ट केले.

मात्र, या कामाबद्दल राहुल रॉय यांना सोशल मीडियावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला. यावर प्रतिक्रिया देताना अभिनेत्याने स्पष्ट केले की, मेहनत करून पैसे कमावण्याचा तो एक मार्ग आहे. त्यांच्या मते, कोणतेही काम लहान नसते, विशेषतः जेव्हा एखादी व्यक्ती पुन्हा आपले आयुष्य रुळावर आणण्यासाठी प्रयत्न करत असते. २०२० मध्ये राहुल रॉयला ब्रेन स्ट्रोक आला होता. त्यानंतर त्याच्या आरोग्यावर मोठा परिणाम झाला आणि काम मिळवणेही कठीण झाले होते. या घटनेला आता जवळपास पाच वर्षे झाली असून, या काळात घरखर्च भागवण्यासाठी आपण शक्य ते सर्व काम करत असल्याचे अभिनेत्याने सांगितले.

राहुल रॉय म्हणतो, कधी कधी मी लग्नसमारंभात नृत्य सादर करून दोन किंवा चार लाख रुपये कमावतो.



## अमिषा पटेलने डेटिंगच्या चर्चांवर सोडले मौन

अभिनेत्री अमिषा पटेल वयाच्या पन्नाशीतही सिंगल जीवन जगत आहे. मात्र तिच्या अभिनय कारकिर्दीत अनेकांसोबत तिचे नाव जोडले गेले. आता वयाच्या ५१ व्या वर्षी अमिषा पटेलचे नाव भारतीय क्रिकेटपटू हार्दिक पंड्यासोबत जोडले जात आहे.

अलिकडेच सोशल मीडियावर अमिषा आणि हार्दिक पंड्याचा एक व्हिडीओ समोर आला होता. हे दोघेही एकाच पार्टीला गेले होते आणि त्यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. अमिषा आणि हार्दिक पंड्या यांचा हा व्हिडीओ एका यूजरने सोशल मीडियावर शेअर करत म्हटले, बंगळुरू येथील एका हॉटेलमध्ये पार्टीदरम्यान अमिषा पटेलने ज्या पद्धतीने हार्दिक पंड्याच्या खांद्यावर हात ठेवला, त्यावरून असे वाटतेय रेडिटवरील सर्व अफवा आता खऱ्या ठरणार आहेत.

हार्दिकसोबत एका पार्टीत अमिषा संवाद साधताना दिसल्यानंतर सोशल मीडियावर दोघांच्या नात्याबाबत तर्क–वितर्क लावले जात होते, त्यावर अमिषाने स्पष्टीकरण दिले आहे.

अमिषा पटेलने व्हायरल व्हिडीओबाबत म्हटले की, हो, अगदी बरोबर, तुम्ही बरोबर आहात. ज्या पद्धतीने मी त्याच्या खांद्यावर हात ठेवला होता, ते खरेच खूप रोमँटिक होते. त्यानंतर तिने त्या यूजरला टोला लगावत मी तुला ओळखत नाही, पण तुझी एकही मुलगी मैत्रीण नसेल, असे मला वाटते. अशा गोष्टी पोस्ट करण्याआधी तू एक मैत्रीण बनवलेलीच बरी, असे म्हटले आहे.



# कार्यकारी अभियंता शेख यांचा पत्रक काढून उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रयत्न

## “शेतकऱ्याशी संवाद”साधायचा सोडून पत्रकार परिषद न घेताही घेतल्याचा खोटा दावा

**माजलगाव । शेख मुजफ्फर**

माजलगाव धरणाची उंची अर्धा मिटरने वाढविण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळालेली असुन शासनाच्या सर्व सर्व्हेक्षण व परवानग्या घेतल्यानंतरच हे काम होणार असुन धरणाची उंची वाढविल्यास अतिरिक्त भुसंपादनाची आवश्यकता भासनार नाही व सिंचनामध्ये ३८ दशलक्ष घनमिटर ज्यादा पाणी साठवण होणार आहे. यामुळे शेतक–यांना याचा सिंचनासाठी थेट लाभ मिळणार असल्याचे कार्यकारी अभियंता एस. एम. शेख यांनी पत्रक काढून सांगीतले. खरं पाहता आक्रमक झालेल्या शेतकऱ्याशी संवाद साधून त्यांचा गैरसमज दूर करण्याची गरज असताना नेहमीप्रमाणे उंटावरून शेळ्या हाकण्याचा प्रयत्न शेख यांनी केल्याची प्रतिक्रिया २२ पुनर्व्हसित गावातील शेतकऱ्यांनी दिली.वरून पत्रक काढले असताना पत्रकार परिषद घेतल्याचा खोटा दावा केला यामुळे एस एम शेख शेतकऱ्यापासून काहीतरी लपवत असल्याचा पण संशय व्यक्त होत आहे

पत्रकार परिषद घेतल्याचा खोटा दावा करून काढलेल्या पत्रकात माजलगाव कालवा विभाग क्रं. १० परभणीचे कार्यकारी अभियंता एस. एम. शेख यांनी सांगीतले की, माजलगाव धरण जायकवाडी प्रकल्प टप्पा २ हे गोदावरी नदीची उपनदी असलेल्या सिंदफणा नदीवर बांधण्यात आलेले आहे. या धरणाचे काम १९८६ ला पुर्ण झाले होते. मागील ४० वर्षांत धरणामध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्यामुळे आणि पिण्याच्या व उद्योगाच्या पाण्याचा वापर वाढल्यामुळे शेतीसाठी उपलब्ध होणा–या पाण्यात घट झाली आहे. या समस्येवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १८ ऑगस्ट २०२६ ला झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत माजलगाव धरणाच्या गेटची उंची ०.५० मिटरने अर्धा मिटर वाढविण्यास मंजुरी दिली आहे. या धरणामध्ये ३८ दशलक्ष घनमिटर ज्यादा पाणी साठवता येईल ज्याचा थेट फायदा शेतक–यांच्या शेतीला मिळणार आहे तसेच ज्यादा जमिन संपादन केली जाणार नाही. धरणाच्या गेटची उंची वाढविली तरीही परिसरातील कोणतीही नविन शेती किंवा जमिन अधिगृहीत केली जाणार नाही. वाढलेले पाणी धरणाच्या आधीच संपादित केलेल्या शासनाच्या मालकीच्या हद्दीतच साठवले जाणार आहे. त्यामुळे कोणत्याही नविन जमिनी पाण्याखाली जाण्याचा किंवा बुडण्याचा धोका नाही. माजलगाव धरणाची उंची वाढविल्यामुळे अतिरिक्त भुसंपादन करण्याची आवश्यकता नाही. संपादित जमिनीमध्येच अतिरिक्त पाणी साठवले जाणार आहे तसेच शासनाच्या धोरणानुसार शासनाच्या संस्थेमार्फतच सर्व्हेक्षण करून तसेच शासनाच्या सर्व परवानग्या घेवुनच हे काम होणार असुन सदरील काम हे दोन कोटी रूपये खर्चाचे काम असल्याचेही कार्यकारी अभियंता एस. एम. शेख यांनी या पत्रकात सांगीतले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

# जिल्ह्यातील प्रलंबित तक्रारींचे २ दिवसात निवारण करा–जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड (सरकार): महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. तरी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर प्रलंबित असलेल्या सर्व तक्रारींचे पुढील दोन दिवसांत निवारण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व राष्ट्रीयकृत बँकांना दिले आहेत.




जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांच्यासह जिल्ह्यातील विविध बँकांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी राष्ट्रीयकृत बँकांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली. तसेच बँकांनी कोणत्याही परिस्थितीत आगामी दोन दिवसांत सर्व तक्रारी निकाली काढाव्यात, जेणेकरून पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असे आदेशही बैठकीत देण्यात आले. या बैठकीत जिल्ह्यातील कर्जमुक्ती योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला आणि प्रलंबित प्रकरणावर चर्चा करण्यात आली.

बीड जिल्ह्यातील एकूण २,२७,१२८ थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची माहिती योजनेच्या विशेष पोर्टलवर भरण्यात आली आहे. यापैकी ९६,५२३ शेतकऱ्यांची पहिली यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रसिद्ध यादीतील ७९,६८१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. अद्याप १६,८४२ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले नाही. आधार प्रमाणीकरण प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांपैकी ८,३०५ शेतकऱ्यांनी अजूनही त्यांचा फार्मर प्राप्त करून घेतलेला नाही, ज्यामुळे त्यांचे प्रमाणीकरण रखडले आहे. या योजनेचा लाभ घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या विविध अडचणींवर ऑनलाइन पोर्टलद्वारे तक्रारी नोंदवण्याची सुविधा देण्यात आली आहे. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या संदर्भात जिल्हास्तरावर एकूण २६७ तक्रारी आणि तालुकास्तरावर ४७ तक्रारी प्रलंबित आहेत. अशी माहिती यावेळी देण्यात आली. प्रशासनाने इतर शेतकऱ्यांनाही त्यांचे फार्मर आयडी प्राप्त करण्याचे तसेच आपले आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

# समता क्रांती मार्च रॅली ताकदीने यशस्वी करा–पप्पू कागदे

## रिपाइंच्या जिल्हा पदाधिकारी बैठकीत आवाहन




बीड (सरकार) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने राज्यभर समता क्रांती मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. समता क्रांती मार्च रॅलीच्या अनुषंगाने केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी बीड शहरात समता क्रांती मार्च रॅली व जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी दि.८ सप्टेंबर २०२६ मंगळवार रोजी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात बीड जिल्हा रिपाइं पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची मशाल घेऊन या देशात समता नांदावी ही भूमिका घेऊन महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला ७५ वर्षे पूर्ण झाले असून यावर्षी क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले यांची २०० वी जयंती देशभरात साजरी करण्यात येत आहे. या क्षणांचे औचित्य साधून राज्यभर केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली समता क्रांती मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी बीड शहरात होणाऱ्या समता क्रांती मार्च रॅली यशस्वी करण्यासाठी व आपल्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी समता क्रांती मार्च रॅली यशस्वी करण्यासाठी जिल्हाभर रिपाइं कार्यकर्त्यांनी ताकदीने कामाला लागावे. असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी बीड जिल्हा रिपाइं पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केले. यावेळी राजू जोगदंड, मझर खान, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, किसन तांगडे, दीपक कांबळे, प्रमोद दासूद, महादेव उजगरे, अरुण भालेराव, धोंडीराम सिरसट, शरण मस्के, सचिन कागदे, अरुण निकाळजे, गोवर्धन वाघमारे, दशरथ शिंदे, ज्ञानोबा माने, दशरथ सोनवणे, शाहू डोळस, महेश आठवले, बापू पवार, महेंद्र निकाळजे, गंगाधरआप्पा रोडे, महादेव बनसोडे, सादेक कुरेशी, मायाताई मिसळे, राणी गायकवाड, अनिता तुरुकमारे सुजित वैरागे, महंमद अन्सारी, अरुण कांबळे, दयानंद सोनवणे, संभाजी गायकवाड, सुभाष तांगडे, भगवान ससाणे, संदिपान डोंगरे, बाबा देशमाने, राहुल वाघमारे, वामन पाईक, रविंद्र जोगदंड, दिलिप बनसोडे, मधुकर साळवे, विकास आरकडे, विनोद आठवले, राहुल सरवदे, बंटी गायसमुद्रे, कुणाला निकाळजे, प्रभाकर चांदणे, रविंद्र तुपारे, अविनाश जोगदंड, बाळासाहेब गव्हाणे, अमोल धन्वे, विलास जोगदंड, मनोज बोराडे, भैय्या साळवे, विशाल मिसळे, शाम वीर, पप्पू वाघमारे, अक्षय कोकाटे, नामदेव वाघमारे, सतिष शिनगारे, नवनाथ डोळस, भास्कर जावळे, राहुल कांबळे, प्रविण धन्वे, विजय ओव्हाळ बिभीषण जावळे, धम्मा पारवेकर, भीमराव घोडेराव, राजाभाऊ वक्ते, सचिन वडमारे, रमेश जावळे, सोनू वडमारे, यांच्यासह शेकडो रिपाइं कार्यकर्ते उपस्थित होते.

# नरेगाच्या कुशल कामांची पेमेंट तात्काळ सुरू करा–जिल्हाप्रमुख जगताप

बीड (सरकार): महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा/जी–रामजी) अंतर्गत पूर्ण झालेल्या वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाच्या कुशल कामांची बिले ऑनलाइन झाल्यानंतरही त्यांची पेमेंट प्रक्रिया प्रलंबित ठेवण्यात येत असल्याने आता शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. मंजूर, पूर्ण आणि ऑनलाइन बिले झालेल्या कामांची देयके कोणत्याही दबावाखाली रोखू नयेत; पारदर्शक नियमांनुसार तातडीने पेमेंट करण्यात यावे, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी केली आहे.



नरेगा अंतर्गत ग्रामीण भागात गायगोठे, विहिरी, फळबाग लागवड, नाफेड अंतर्गत विविध कामे, सिमेंट रस्ते, खडीकरण यांसह अनेक वैयक्तिक व सार्वजनिक विकासकामे केली जातात. या कामांमधून ग्रामीण भागातील लाभार्थी, मजूर तसेच विविध यंत्रणांना आर्थिक आधार मिळतो. मात्र, कामे पूर्ण करून त्यांची कुशल बिले ऑनलाइन झाल्यानंतरही देयके प्रलंबित राहिल्याने संबंधित लाभार्थी व कामाशी निगडित घटक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही पेमेंट थांबविण्याचे कारण काय?, असा सवाल उपस्थित करत जिल्हाप्रमुख जगताप यांनी प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेण्याची मागणी केली आहे. शासनाच्या ग्रामीण विकासाच्या योजनांचा उद्देश केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात साध्य व्हायचा असेल, तर पूर्ण झालेल्या कामांची देयके वेळेत अदा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ऑनलाइन झालेली कुशल बिले तपासून त्यामध्ये नियमबाह्य बाबी नसतील तर कोणाच्याही दबावाला बळी न पडता संबंधित कामांची पेमेंट प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी ठाम भूमिका शिवसेनेच्या वतीने घेण्यात आली आहे. पेमेंटला अनावश्यक विलंब झाल्यास लाभार्थी, ग्रामपंचायती तसेच संबंधित कामाशी निगडित नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने प्रलंबित देयकांचा तातडीने निपटारा करून नरेगा योजनेतील लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे वेळेत मिळतील, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी केले आहे. तसेच नरेगा अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची पेमेंट मिळण्यात कोणाची अडवणूक होत असेल किंवा विनाकारण देयक रोखले जात असेल, तर संबंधित लाभार्थ्यांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे संपर्क साधावा, असे आवाहनही शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे. लाभार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शिवसेना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त बीडमध्ये विद्यार्थ्यांसाठी ‘माझा बाप्पा इकोफ्रेंडली स्पर्धा’

**माझा बाप्पा इकोफ्रेंडली स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे– नगरसेविका सौ. मनिषा गिराम, जिल्हा प्रमुख उल्हास गिराम**

बीड (सरकार) बीड शहरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी ‘इकोफ्रेंडली गणेश मूर्ती स्पर्धा’ आयोजित करण्यात आली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बीड जिल्हाप्रमुख उल्हास प्रकाशराव गिराम आणि बीड नगरपरिषदेच्या नगरसेविका सौ. मनीषा उल्हास गिराम यांच्या पुढाकारातून ही स्पर्धा घेतली जात आहे.





पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा आणि विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळावा, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे.

स्पर्धेचे नियम व अटी : विनामूल्य प्रवेश: ही स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे विनामूल्य आहे. घरीच मूर्ती बनवणे: विद्यार्थ्यांनी गणेशमूर्ती स्वतःच्या घरीच तयार करायची आहे.पर्यावरणपूरक साहित्य: मूर्ती बनवण्यासाठी शाडूची माती, लाल माती किंवा कागदाचा लगदा यांसारख्या विघटनशील साहित्याचा वापर करणे बंधनकारक आहे.साहित्य वाटप: आयोजकांकडून स्पर्धकांना कोणतेही साहित्य दिले जाणार नाही.मूर्ती जमा करण्याचे ठिकाण व तारीख: पूर्ण झालेली मूर्ती दिनांक २० सप्टेंबर २०२६ पर्यंत शिवसेना कार्यालय, हॉटेल मैथिली शेजारी, बीड येथे जमा करायची आहे. स्पर्धेचे गट व बक्षीसांचे स्वरूप : स्पर्धा दोन गटांत विभागण्यात आली असून आकर्षक रोख रकमा, स्मार्ट वॉच, शिल्ड व प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. तसेच प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रमाणपत्र प्रदान केले जाईल.

अ – गट (इयत्ता ५ वी ते ७ वी) :

प्रथम क्रमांक: २,१००/– रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र

द्वितीय क्रमांक: १,५००/– रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र

तृतीय क्रमांक: १,१०/ – रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र

ब – गट (इयत्ता ८ वी ते १० वी) :

प्रथम क्रमांक: ३,१००/– रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र

द्वितीय क्रमांक: २,१००/– रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र

तृतीय क्रमांक: १,५००/ – रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र

शाळेसाठी विशेष बक्षीस : ज्या शाळेचे सर्वाधिक विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होतील, त्या एका शाळेस ५,०००/– रोख आणि ’बाळासाहेब ठाकरे सन्मानचिन्ह’ देऊन गौरवण्यात येईल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे: ९१५८९६३७३७,९६९६३७३७३७, ९८९०१५३३११ पर्यावरणरक्षणाचा संदेश देणाऱ्या या अनोख्या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक उल्हास गिराम व सौ. मनीषा गिराम यांनी केले आहे.

# युवा महोत्सवामध्ये स्वा.सावरकर महाविद्यालयास पाच पारितोषिके

बीड (सरकार): डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सव हा यावर्षी पंडित पार्डीकर महाविद्यालय शिरसाळा येथे संपन्न झाला. या युवक महोत्सवात सावरकर महाविद्यालयाला पाच पारितोषिक मिळाली. या महोत्सवामध्ये एकूण ७२ विविध महाविद्यालयाच्या संघाने सहभाग नोंदवला होता. दिनांक ४ आणि ५ सप्टेंबर या दोन दिवसांच्या युवा महोत्सवामध्ये याही वर्षी शोभायात्रा या स्पर्धा प्रकारांमध्ये आपली परंपरा कायम चालू ठेवत सर्व द्वितीय क्रमांक मिळवला.

यामध्ये भारतीय ज्ञान परंपरा या विषयाला पूरक म्हणून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतातील प्राचीन संशोधन ज्ञान परंपरा आणि मानवतावादी ज्ञान परंपरा हा विषय घेऊन संशोधन परंपरांमध्ये आचार्य पाणिनी,चरक, सुश्रुत आर्यभट्ट, भास्कराचार्य यांचा कालखंड व संशोधनाची बाजू स्पष्ट केली. तर दुसऱ्या बाजूस तथागत गौतम बुद्ध यांच्या अष्टांगिक मार्ग संत ज्ञानेश्वराचे पसायदान, संत कबीराचे दोहे, जगद्गुरु तुकाराम महाराज यांची अभंग गाथा या सर्वांचा समन्वय दृश्य स्वरूपामध्ये शोभायात्रेत दाखवण्यात आला होता.याबरोबरच शास्त्रीय तालवाद्य तृतीय पारितोषक, शास्त्रीय संगीत द्वितीय पारितोषिक, सुगम संगीत द्वितीय आणि नाट्यसंगीत प्रथम पारितोषक महाविद्यालयास प्राप्त झाले. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे आणि उपप्रचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर,उपप्राचार्य डॉ. रमेश खंडागळे यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयातील एकूण सोळा विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पारितोषिक प्राप्त केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गायकवाड जोगेंद्र व सदस्य प्रा. राम गव्हाणे, प्रा.दीपा देशपांडे आणि रुक्मिणीकांत पांडव यांनी विशेष श्रम घेतले तसेच विद्यार्थ्यांमध्ये वेद मुळे, कृष्णा खामकर, नागेश मिटकरी, श्रेयश राऊत ,शुभम पांचाळ ,ज्ञानेश्वर बनसोडे, गोपाळ काळे, कु. वैष्णवी यादव, नंदिनी रुईकर राधा घिगे, तनिषा हिरण विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सर्व विजयी स्पर्धकांचे महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. रमेश खंडागळे यांनी अभिनंदन केले आहे .

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा व प्रशिक्षणात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे

बीड (सरकार): सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना व कमवा व शिका विभागाच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव२०२६ निमित्त दिनांक १२ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची स्पर्धा व प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

पर्यावरणाचे संवर्धन, मातीच्या गणेशमूर्तींचा वापर, जलप्रदूषणास आळा आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक उत्सवाबाबत जनजागृती निर्माण करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेचा वापर करून आकर्षक व पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार कराव्यात. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. पी. आर. वाणी (मो. ९४२१५१९६८२) , प्रा. डॉ. महेश दाडगे (संगीत विभाग) यांच्याकडे आपली नावे नोंदवावीत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि कमवा व शिका तसेच महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड–४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड–४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही– वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)